# जाहिरात
# राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम
# ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे महानगरपालिकेअंतर्गत इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटीमार्फत राबविण्यात येणा-या राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाकरीता 11 महिन्याच्या कंत्राटी तत्वावर खालीलप्रमाणे रिक्त पदे भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | शैक्षणिक अहर्ता | वयोमर्यादा | मासिक एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डिआरटीबी सेंटर (Senior M.O. DRTB Centre ) | 1 (अ.जा) | **Essensial Qualification:-**<br>१. MBBS or equivalent Degree from institution, recognized by National Medical Commission<br>२. must have competed compulsory rotatory internship.<br>३. One Year experience of working in NTEP.<br><br>**Preferance :-**<br>1. MD Respiratory Medicine / internal medicine / DTCD / MD community medicine / Diploma / Masters in Public Health.<br>2. Basic knowledge of Computers and Nikshay. | 70 वर्षापर्यंत | 60,000/- प्रति महिना |
| 2 | टीबीएचव्ही | 2 (१ वि.जा (अ), 1 आर्थिक दृष्या दुर्बल घटक ) | **Essensial Qualification**<br><br>1. Graduate in science<br>**OR**<br>2. Intermediate (10+2) in science and experience of working as MPW / LHV/ ANM/ Health worker / Certificate<br>**OR** | 38 वर्षापर्यंत (मागास प्रवर्गातील उमेदवाराला 43 वर्षापर्यत वयाची अट शिथील राहील) | शासनाकडुन रु.15500/- (रु.1500 प्रवास भत्ता अतिरीक्त) + महापालिकेकडुन 3105= 20105/- प्रति महिना |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | higher course in Health education / Counseling<br>**OR**<br>3. Tuberculosis health visitor's recognized course<br>4.Certificate course in computer operations ( minimum two months)<br><br>**Preferential:-**<br>Training course for MPW or recognized sanitary inspector's course. | | |

**अटी व शर्ती :-**

१. वरील प्रस्तावीत केलेली पदे ही एकत्रित वेतनावर भरण्यात येतील.

२. उमेदवाराने सोबत दिलेला अर्ज भरुन त्यामध्ये खालील बार्बीचा उल्लेख करावा व अर्ज Envelope मध्ये द्यावे.

अ. उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा अर्जामध्ये स्पष्टपणे उल्लेख करावा.

ब. अर्जदाराचे संपूर्ण नाव, पत्रव्यावहाराचा पत्ता, दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक. व ईमेल आयडी.

क. जन्मतारीख (सोबत जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र जोडावे ).

ड. जात प्रमाणपत्र.

इ.शैक्षणिक अहर्ता मार्कशिट व प्रमाणपत्र.

ई. अनुभव दाखला.

उ. अर्जासोबत पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा.

ऊ. शासकीय / निमशासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी संबंधीत कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

ए. ई.डब्लू.एस या प्रवर्गातुन अर्ज करणा-या उमेदवारांनी शासन मान्य ई.डब्लू.एस प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र न जोडलेल्या अथवा मुदत बाह्य प्रमाणपत्र जोडलेल्या उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील.

वरील सर्व कागदपत्र विहीत मुदतीत सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. तसेच विहीत मुदतीत कागदपत्रे सादर न केल्यास त्यानंतर सादर केलेली कागदपत्रे स्विकारली जाणार नाही.

३. अर्जासोबत वरील सर्व प्रमाणपत्राच्या स्वंय साक्षांकित प्रती जोडण्यात याव्यात.

४. नेमणुकी संदर्भात सोसायटीने घेतलेले सर्व निर्णय अंतिम राहतील.

५. नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा कंत्राटी असल्यामुळे महापालिकेच्या अस्थापनेवर कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही.

६. जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेल्या पदांमध्ये अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संरचनेमध्ये वाढ किंवा घट तसेच निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर निवड समितीने ठरविलेल्या नियमानुसार उमेदवारांच्या अर्जाची चाळणी करण्याचे सर्व अधिकार महापालिकेने राखून ठेवलेले आहेत. याबाबत उमेदवाराला कोणतीही तक्रार अथवा दावा सांगता येणार नाही.

७. एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

८. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची निवड / नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

९. सदर पदाकरिता राखीव प्रवर्गातील उमेदवार प्राप्त न झाल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवारास पुढील 11 महिन्याकरिता नियुक्ती देण्यात येईल.

१०. राष्ट्रीय आरोग्य अभियानअंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वयाची अट 5 वर्ष शिथील राहील.

११. MBBS कोर्स पूर्ण केलेल्या डॉक्टरांना राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (NHM) काम केल्यास अनिवार्य असलेला बॉन्ड पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र DME/ Dean GMC यांच्याकडुन देण्यात येईल.

१२. नियुक्त झालेल्या उमेदवारांना 11 महिन्याकरीता नियुक्ती देण्यात येईल. त्यानंतर कंत्राटी कर्मचाऱ्याचा Performance Report बघून पुर्ननियुक्ती देण्यात येईल.

१३. उमेदवाराने नियुक्तीचे वेळी त्याच्या विरोधात कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा अथवा गंभीर न्यायालयीन प्रकरण नाही याचे Police Verification Certificate देणे बंधनकारक आहे.

१४. अर्जदाराने परिपूर्ण भरलेला अर्ज आवश्यक ती माहिती भरुन साक्षांकित केलेल्या प्रमाणपत्रासह राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम कार्यालय, 4था माळा, आरोग्य विभाग, महापालिका भवन, सरसेनानी जनरल अरुण कुमार वैद्य मार्ग चंदनवाडी, पांचपखाडी, ठाणे (प) -400 602. दूरध्वनी क्र.2533 1211 /2533 1590. विस्तार क्र.414 या पत्यावर दि.17/01/2024 ते दि.25/01/2024 या कालावधीत साय ५:०० वाजेपपर्यंत कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत मिळतील अशा बेताने पोस्टाने / कुरियरने अथवा प्रत्यक्षात जमा करावीत. सदर तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता अर्ज न घेता थेट मुलाखत घेण्यात येईल.

१५. उमेदवारांच्या अर्जाची छाननी करुन शैक्षणिक पात्रता, अतिरिक्त शैक्षणिक अर्हता, अनुभव या आधारावर शासनाच्या नियमानुसार पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी लावण्यात येईल व गुणांकानुसार नियुक्ती आदेश व प्रतिक्षा यादी ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर लावण्यात येईल.

१६. सदरची जाहिरात www.thanecity .gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

सही/-
वैद्यकीय आरोग्य अधिकारी / सदस्य सचिव
इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी-टी.बी.
ठाणे महानगरपालिका, ठाणे

# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## इंटिग्रेटेड हेल्थ अॅण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी

## पदाचे नाव:- टी.बी.एच.व्ही

प्रति,
वैद्यकिय आरोग्य अधिकारी,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव:- .............................................

फोटो

२) पत्रव्यावहाराचा पत्ता:- .............................................

३) दुरध्वनी क्रमांक .............................................

४) ई-मेल आयडी .............................................

५) जन्म तारीख .............................................दि. 30/11/2023 रोजी वय ...........महिने...........

६) ज्या जात प्रवर्गातुन अर्ज करता आहात त्या रकान्यात ✔ अशी खुण करा.
☐ वि.जा-अ (VJ-A) / ☐ आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS)

७) शैक्षणिक अहर्ता

| शैक्षणिक अहर्ता | उत्तीर्ण वर्ष | बोर्ड | एकुण प्राप्त गुण | टक्केवारी / ग्रेड |
|---|---|---|---|---|
| 10 वी | | | | |
| 12 वी | | | | |
| पदवीका | | | | |
| पदवी | | | | |

८) अतिरीक्त शैक्षणिक अहर्ता

| अतिरीक्त शैक्षणिक अहर्ता | उत्तीर्ण वर्ष | बोर्ड | एकुण प्राप्त गुण | टक्केवारी / ग्रेड |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

९) अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | शासकिय / निमशासकिय | खाजगी | नोवरीचा कालावधी | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासुन | पर्यंत | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१०) आपणाविरुध्द न्यायप्रविष्ठ प्रकरण , फौजदारी , शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे का? असल्यास थोडक्यात तपशील द्यावा.

| होय | नाही |
|---|---|
| | |

११) अर्जदार महाराष्ट्राचा आदिवासी आहे का? होय / नाही.

मी.....................................................................राहणार................................................ ........................................................................... ठाणे महानगरपालिकेत ....................... पदाकरीता अर्ज करत असुन असे प्रमाणित करतो / करते की, मी वरीलप्रमाणे नमुद केलेली माहिती सत्य असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल, आणी माझे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी